तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी - 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स - 22692102
E-Mail: desk2a@dte.org.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in

स्मरणपत्र - १

क्रमांक : २अ/एडीएम/२०१६/ ९३५६
दिनांक : 10 OCT 2016

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती, औरंगाबाद, मुंबई, नागपूर, नाशिक, पुणे

विषय : शैक्षणिक वर्ष २०१६-१७ करिता राखीव प्रवर्गात प्रवेश घेणा-या उमेदवारांच्या प्रमाणपत्र पडताळणीबाबत..

संदर्भ : या संचालनालयाचे पत्र क्र.२अ/एडीएम/२०१६/११३५, दि.२०/०८/२०१६

उपरोक्त विषयासंदर्भाधीन या संचालनालयाचे पत्र कृपया पहावे. सदर पत्रान्वये आपल्या विभागातील सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांमधील अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि अपंग (ST/VJ/NT/Person With Disability(PWD) या प्रवर्गातील प्रवेशित उमेदवारांची प्रकरणे संबंधित संस्था स्तरावरुन संबंधित प्राधिकरणाकडे पाठविण्यात आल्यानंतर त्याचा अहवाल आपल्या कार्यालयामार्फत एकत्रित रित्या संचालनालयास पाठविण्यात यावा. संबंधित प्राधिकरणाकडून अहवाल प्राप्त झाल्यावर त्यापैकी किती प्रकरणे बनावट आढळली याबाबतचा अहवाल संचालनालयास दिनांक १६ सप्टेंबर २०१६ पर्यंत सादर करण्याबाबत आपणास कळविण्यात आले होते . काही प्रकरणी उमेदवारांचे इतर मागास प्रवर्गाचे प्रमाणपत्र सुध्दा बनावट असल्याचे आढळून आले आहे.

तेव्हा संबंधित प्राधिकरणाकडून प्रमाणपत्रांची सत्यता पडताळणी तात्काळ करुन घेणे आवश्यक असल्यामुळे याबाबत सर्व संबधित संस्थाना आपल्यास्तरावरुन तात्काळ सूचना देण्यात याव्यात व त्याचा पाठपुरावा आणि त्याबाबत प्रगतीचा आढावा घेऊन अशा प्रकरणांची नोंद आपल्या कार्यालयात घेऊन एकत्रित अंतिम अहवाल या संचालनालयास ३० सप्टेंबर २०१६ पर्यंत सादर करावा असे ही आपणांस कळविण्यात आले होते.

तथापि वरील सुचनेनुसार आपल्या कार्यालयाकडून अहवाल अद्याप या संचालनालयास प्राप्त झालेला नाही तरी सदर्भाधिन पत्रातील सूचना आणि दि.१९/०९/२०१६ च्या संचालनालयातील बैठकीत देण्यात आलेले निर्देश विचारात घेऊन सदर अहवाल दिनांक १७/१०/२०१६ पर्यंत या संचालनालयास सादर करण्यात यावा.

(दयानंद मेश्राम)
सहसंचालक,तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

पृष्ठांकन क्र.विकाऔ/शिक्षण/२०१६/८५६३
दिनांक :- 21 OCT 2016

या कार्यालयाच्या अधिनस्त येत असलेल्या पदविका/पदवी व पदव्युत्तर पदवी व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्था प्रमुख यांना सुचित करण्यात येते की, संस्थेत प्रवेशीत असलेल्या अनुसुचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि अपंग (ST/VJ/NT/Person With Disability (PWD) प्रवर्गातील उमेदवारांच्या प्रमाणपत्र पडताळणीबाबत वरील पत्रान्वये कार्यवाही करून अहवाल या कार्यालयास तात्काळ सादर करण्यात यावा.

प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत :- या कार्यालयाचे प्रोग्रामर यांना प्रत देण्यात येवून सुचित करण्यात येते की, सदरील पत्र या कार्यालयाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.